East:1962
NAAC 'A' Grade

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000
E-mail address- affiliationt1@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)

जा.क्र. शिवाजी वि./संलग्नता टी.१/प्रशांत/ No 7036 दिनांक : 12 JUL 2018

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त शिक्षण संस्था,

विषय-नियमित रिक्त प्राचार्य पद तात्काळ भरण्याबाबत.

संदर्भ-१)महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र१७०/मशि-५ दिनांक २३ एप्रिल २०१८ रोजीचे परिपत्रक.

२)मा.शिक्षण संचालक(उच्च शिक्षण) डॉ.धनराज माने यांचे क्र एनजीसी-२०१७/रिक्त पदे/नांवि/मवि-२/४९४५/दिनांक २३ एप्रिल २०१८ रोजीचे पत्र.

३)या कार्यालयाचे जा.क्र शिवाजी वि./संलग्नता टी-१ /प्रशांत /४०९२ दिनांक १० मे २०१८ रोजीचे पत्र.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, शासन परिपत्रकाची प्रत व मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांचे पत्र वरील संदर्भीय ३ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था यांना माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले होते. सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर दिनांक १० मे २०१८ रोजी ठेवण्यात आलेले आहे.

तरी ज्या महाविद्यालयांनी नियमित प्राचार्य पद भरण्याबाबतची कार्यवाही केलेली नाही अशा महाविद्यालयांनी नियमित प्राचार्य पद भरण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावी अन्यथा नियमित रिक्त प्राचार्य पद न भरल्यास होणा-या संभाव्य परिणामाची सर्व जबाबदारी संस्था/महाविद्यालय यांची राहील याची नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव

सोबत वरील प्रमाणे